**प्रकरण ३**

# आदीलशाही आणि निजामशाही

## आदिलशाही (१४८९ — १६८६)

पंधराव्या शतकाच्या अखेरीस दक्षिण हिंदुस्थानात स्थापन झालेली एक मुसलमानी राजसत्ता. ϑबहमनी सत्ता निष्प्रभ झाल्याचा फायदा घेऊन त्याच राज्यातील विजापूरचा सुभेदार यूसुफ आदिलखान १४८९ मध्ये स्वतंत्र झाला. तोच आदिलशाही घराण्याचा संस्थापक होय. सुमारे दोनशे वर्षे या घराण्याची सत्ता दक्षिणेत होती. या काळात युसूफ आदिलखान (१४८९ — १५१०), इस्माइल आदिलशहा (१५१० — १५३५), इब्राहिम आदिलशहा (१५३५ — १५५७), पहिला अली आदिलशहा (१५५७ — १५८०), दुसरा इब्राहिम आदिलशहा (१५८० — १६२७), मुहंमद आदिलशहा (१६२७ — १६५६), दुसरा अली आदिलशहा (१६५६ — १६७२) आणि दुसरा शिकंदर आदिलशहा (१६७२ — १६८६) असे सुलतान होऊन गेले.

यूसुफ आदिलखान मुत्सद्दी, कर्तबगार व सहिष्णू होता. इस्माइल आदिलशहाच्या कारकीर्दीत अनेक लढाया व कटकारस्थाने झाली. या दोन्ही सुलतानांची कारकीर्द आदिलशाही सत्ता सुस्थिर करण्यात गेली. यासाठी त्यांना बहमनी राज्यातील अमीर बरिदशी झगडावे लागले. यूसूफने विजयानगरच्या राजाशी तह करून बरिदचा पराभव केला. यानंतर विजयानगरच्या राजाने केलेल्या स्वाऱ्या यूसुफने परतविल्या.

यूसुफकडून १५१० मध्ये पोर्तुगीजांनी गोवे काबीज करून कुडाळपासून चित्ताकूलपर्यंतचा प्रदेश जिंकला. इस्माइल आदिलशहाने १५२४ मध्ये पोर्तुगीजांकडून साष्टी, बारदेश आणि त्याभोवतालचा प्रदेश हस्तगत केला. इब्राहिम व पहिला अली आदिलशहा यांचा पोर्तुगीजांशी संघर्ष निर्माण झाला. इब्राहिमचा प्रतिस्पर्धी शहाजादा अब्दुल्ला हा १५४३ मध्ये पोर्तुगीजांच्या आश्रयास गेला. पोर्तुगीजांनी त्यास मदत करू नये, म्हणून इब्राहिमने साष्टी व बारदेश हे प्रांत पोर्तुगीजांना बहाल केले. १५७०-१५७१ मध्ये अली आदिलशहाने मुर्तजा निजामशहा व कालिकतचा सामुरी (झामोरीन) यांच्याशी हातमिळवणी करून गोवा व चौल घेण्याचा प्रयत्न केला. पण त्यात त्यांना यश मिळाले नाही.

आदिलशाही सुलतानांना निजामशहा, कुतुबशहा, बरिदशहा व विजयानगरची सत्ता यांच्याशी सतत झगडावे लागले. विजयानगरच्या राजाने जिंकून घेतलेल रायचूर, मुद्‌गल हे प्रांत इस्माइलने अनेकदा प्रयत्न करून जिंकून घेतले. अमीर बरिदने निजामशहाच्या मदतीने विजापूर घेण्याचा प्रयत्न केला होता, परंतु इस्माइल व इब्राहिम आदिलशहांनी त्यांचा पराभव करून सोलापूर जिंकून घेतले. अमीर बरिद मरण पावल्यावर आदिलशाही सुलतानांच्या मागची कटकट कमी झाली.

आदिलशाही आणि ϑ निजामशाही सुलतानांमध्ये १५३१ ते १५९४ पर्यंत राज्यवृद्धीसाठी संघर्ष चालू होता. सोलापूरचा किल्ला व त्याखालील साडेपाच परगणे हे त्यांच्यातील युद्धाचे मुख्य कारण होते. निजामशहाने विजयानगरचा रामराजा आणि कुतुबीकुत सुलतान यांच्या मदतीने १५४३ मध्ये विजापूरच्या प्रदेशावर स्वारी केली. तेव्हा आदिलशाही प्रधान आसदखान याने विजयानगरच्या राजाशी तह केला. निजामशहाला सोलापूर महाल दिला व कुतुबशहाशी लढून त्याचा पराभव केला. बुऱ्हाण निजामशहाला सोलापूर परगणा मिळूनही तो तृप्त नव्हता. आसदखान मरण पावल्यावर, १५४९ मध्ये निजामशहाने विजयानगरच्या रामराजाशी तह करून विजापूरच्या प्रदेशावर स्वाऱ्या केल्या. त्याने रामराजासाठी रायचूर व मुद्‌गल आणि स्वतःसाठी कल्याणी व सोलापूर अशी ठाणी जिंकून घेतली.

अली आदिलशहाने विजयानगरच्या रामराजाची मदत घेऊन निजामशहाने केलेल्या स्वाऱ्या परतविल्या. याचा फायदा विजयानगरच्या राज्याला मिळाला. त्या राज्याची सत्ता वाढली. त्यामुळे त्या राज्यात व आदिलशाही सत्तेत वितुष्ट आले. थोड्याच दिवसांत निजामशहा व आदिलशहा हे एकमेकांतील वैर विसरले. स्नेहसंबंध दृढ करण्यासाठी १५६४ मध्ये हुसेन निजामशहाने आपली मुलगी ϑचांदबिबी व सोलापूरचा किल्ला पहिला अली आदिलशहा याला दिला.

यानंतर अली आदिलशहा, निजामशहा, इब्राहिम कुतुबशहा आणि अली बरिद यांनी एकत्र होऊन १५६५ मध्ये तालिकोटच्या लढाईत विजयानगरचे राज्य नष्ट केले.

निजामशहा व आदिलशहा यांच्यातील मैत्री फार काळ टिकू शकली नाही. त्यांच्यात पुन्हा स्पर्धा सुरू झाली. मुर्तजा निजामशहा अल्पवयी असल्याचा फायदा घेऊन अली आदिलशहाने निजामशहाला मिळालेला पूर्वीच्या विजयानगर राज्यातील प्रदेश जिंकून घेतला. यावेळी विजापूर राज्याची सीमा उत्तरेस नीरा, अक्कलकोट, नळदूर्ग, कल्याणपर्यंत, (काही अपवाद सोडून) पश्चिमेस बाणकोटच्या दक्षिणेकडील समुद्र किनाऱ्यापर्यंत, दक्षिणेस तुंगभद्रा नदीपर्यंत आणि पूर्वेस रायचूर, यादगीर, बिदरपर्यंत होती.

अली आदिलशहाचा १५८० मध्ये एका खोजाने खून केल्यानंतर त्याचा पुतण्या दुसरा इब्राहिम आदिलशहा गादीवर आला. तो अल्पवयी असल्याने चांदबिबी व दिवाण कारभार पाहू लागले. राज्यकारभार बळकावण्याच्या महत्त्वाकांक्षेने चांदबिबीला कैद करण्यापर्यंत दिवाणाची मजल गेली होती. थोड्याच दिवसांत तिची सुटका करण्यात आली. विजापूर दरबारात उत्तरी व दक्षिणी लोकांत सत्तास्पर्धी सुरू झाली. याचा फायदा घेऊन मुर्तजा निजामशहाने कधी एकट्याने, तर कधी कुतुबशहाच्या मदतीने विजापूरवर स्वाऱ्या केल्या. इब्राहिम आदिलशहाची बहीण मुर्तजा निजामशहाच्या मुलाला देऊन सोयरिकीच्या संबंधांनी या दोन्ही राज्यांत पुन्हा मैत्रीचे संबंध जोडले गेले पण हे मैत्रीचे संबंध फार काळ टिकू शकले नाहीत. वयात येताच इब्राहिमने सर्व राज्यकारभार आपल्या हातात घेऊन मलनाड राजाकडून खंडणी वसूल केली. त्याने निजामशाहीविरुद्ध यशस्वीपणे प्रतिकार केला असला, तरी मलिकंबरबरोबर झालेल्या लढाईत त्याला पराजय पतकरावा लागला. १६१९ मध्ये इब्राहिमने बरिदशाहीवर स्वारी करून, तिचा सर्व मुलूख जिंकून आपल्या राज्यास जोडला.

आदिलशाही सुलतानांनी १५९४ ते १६३६ पर्यंतच्या काळात निजामशाहीशी वैर विसरून त्या राज्यावर आलेल्या मोगलांच्या आक्रमणाविरुद्ध चांदबिबीला व निजामशाही तारण्यासाठी झटणाऱ्या ϑ शहाजीला सर्व तऱ्हेचे साहाय्य दिले, निजामशाही बुडाल्यानंतर (१६३७) शहाजी आदिलशहाकडे नोकरीला राहिला. आदिलशहाने त्याला कर्नाटकात काही परगणे व महाराष्ट्रात इंदापूर, पुणे, बारामती ही परगणे जहागीर म्हणून दिले.

इब्राहिमनंतर गादीवर आलेला अहंमदशहा व मोगल बादशहा शहाजहान यांच्यात वितुष्ट आले. १६३१, १६३२ व १६३५ या साली शहाजहानने निरनिराळ्या कारणांवरून विजापूरवर स्वाऱ्या केल्या. शेवटी १६३६ मध्ये तह होऊन कृष्णा नदीच्या पलीकडील प्रदेश मोगलांकडे आणि कृष्णा नदीच्या अलीकडील प्रदेश आदिलशहाकडे राहिला. आदिलशहाने मोगल बादशहास सालीना २० लाख होन खंडणी देण्याचे कबूल केले.

अली आदिलशहाच्या कारकीर्दीत आदिलशाहीस उतरती कळा लागली. त्याला मोगलांच्या व मराठ्यांच्या वाढत्या सत्तेबरोबर सामना द्यावा लागला होता. □औरंगजेबाने पूर्वीचा तह मोडून बिदर, कल्याणी आणि गुलबर्गा जिंकले. १६६६ मध्ये मोगल सरदार जयसिंग याने विजापूरवर हल्ला केला.

शिवाजीने आदिलशाही मुलखातील मावळ प्रदेशातील अनेक गड घेऊन स्वराज्यस्थापनेस सुरवात केल्यामुळे त्याचे व अली आदिलशहाचे संबंध बिघडले. □ शिवाजीच्या उद्योगावर दडपण आणण्यासाठी अली आदिलशहाने शहाजीला कैद केले. युक्तीने शहाजीची सुटका केल्यानंतर शिवाजीने आदिलशाही मुलूख पादाक्रांत करण्याचा उपक्रम चालूच ठेवला. या उपक्रमाला आळा घालण्यासाठी अली आदिलशहाने अफजलखानास शिवाजीच्या पारिपत्यासाठी पाठविले. शिवाजीने अफजलखानाचा वध केला. यानंतर सिद्दी जोहाराला शिवाजीच्या विरुद्ध पाठविले. १६७५ पर्यंत शिवाजी व आदिलशहा यांच्यात संघर्ष चालू होता.

अल्पवयी शिकंदरशहाच्या कारकीर्दीत राज्यात अंतर्गत बंडाळी निर्माण झाली होती. त्याचा फायदा शिवाजी व औरंगजेब यांनी घेऊन आपापल्या राज्यांचा विस्तार केला.

आदिलशाही राज्यात पठाणांचे वर्चस्व वाढत होते. त्याचा फायदा घेऊन मोगल तेथे सत्ता स्थापन करण्याच्या विचारात होते. दक्षिण हिंदुस्थान स्थानिक सत्ताधीशांच्या ताब्यात राहाण्यासाठी शिवाजीने आदिलशाही व कुतुबशाही सुलतानांशी १६७५-१६७६ मध्ये तह केले व पठाणांच्या वाढत्या सत्तेला आळा घालून, मोगलांच्या प्रतिकाराची सिद्धता केली. दक्षिण पादाक्रांत करण्याच्या ईर्षेने औरंगजेबाने १६८३ पासून आदिलशाही राज्यावर आक्रमण सुरू केले. त्यावेळी छत्रपती  संभाजी व कुतुबशहा यांनी शिकंदर आदिलशहाला सर्वप्रकारे साह्य दिले. १६८६ मध्ये औरंगजेबाने सुलतानांना वार्षिक तनखा देऊन आदिलशाही राज्य खालसा केले.

आदिलशाही राज्यपद्धती साधी होती. सुलतान सर्वश्रेष्ठ असे. त्यानंतर सर्वात मोठा अधिकारी वकील (वजीर) असून तोच मुख्य शासनाधिकारी असे. त्याच्या खालोखाल मीरजुमला आणि त्यानंतर मुसत फिऊल मुल्क असे. १५६५ नंतर पहिला अली आदिलशहा याच्या कारकीर्दीत त्याचा वकील अफजलखान शिराझीने खातेविभागणी करून प्रत्येक खात्यावर नामांकित अधिकाऱ्यांची नेमणूक केली. ही राज्यकारभाराची पद्धत शिराझीनंतर पुढे चालू राहिली. मुहंमद आदिलशहाने न्यायनिवाडा, राज्याचा व किल्ल्यांचा बंदोबस्त, रयतेशी वागणूक अशा अनेक बाबींसंबंधी सुमारे ९६ नियम करून ठेवले होते. आदिलशाहीच्या पाच सुलतानांनी स्वतःची नाणी पाडली होती.

आदिलशाही सरदारांपैकी काहींनी शिया व काहींनी सुन्नी पंथाचा स्वीकार केला. तरीपण हिंदूंवर त्यांची कृपादृष्टी होती. कित्येक जबाबदारीच्या कामावर हिंदू अधिकाऱ्यांची नेमणूक केलेली होती. दरबारचे सर्व कामकाज कित्येकदा मराठीतच चाले. आदिलशाही

सरदारांनी विजापूर शहराची स्थापना करून व्यापारी पेठा वसविल्या. परांडा, मिरज, सोलापूर, मुद्गल इ. ठिकाणी किल्ले बांधले.

आदिलशाही सुलतानांचा बहुतेक काळ सत्ता टिकविण्यात किंवा तिची वाढ करण्यात गेला असला, तरी त्यांनी संगीत, चित्रकला व वास्तुकला यांकडे दुर्लक्ष केले नाही. आदिलशाही चित्रशैली त्यांच्या उच्च अभिरूचीची साक्ष देते. गगनमहाल, जुम्मा मशीद, शहाबुरूज, सातमजली माडी, आनंदमहाल, आरसामहाल, गोलघुमट, इ. सुंदर वास्तू उभारून विजापूरच्या सुलतानांनी आपल्या वैभवात भरच घातली.

**विजापूर :**

कर्नाटक राज्यातील इस्लामी वास्तूशैलीसाठी ख्यातनाम असलेले इतिहासप्रसिद्ध पर्यटन स्थळ आणि त्याच नावाच्या जिल्हयाचे मुख्यालय. लोकसंख्या १,८६, ९३९ (१९९१). ते दक्षिण रेल्वेच्या मुंबई-बंगलोर रूंदमापी मार्गावर, मुंबईच्या आग्नेयीस सु.४०२ किमी.आणि सोलापूरच्या दक्षिणेस सु. ८१ किमी. वर वसले आहे. ते रस्त्याने पंढरपूर, सोलापूर, सांगली इ. महाराष्ट्रातील शहरांशी तसेच आंध्रप्रदेशातील हैदराबाद व कर्नाटकातील इंडी, बादामी इ. गावांशी जोडले आहे. विजापूर नावाविषयी इतिहासज्ञांत एकवाक्यात नाही, तथापि कोरीव लेख, संस्कृत-कन्नड-फार्सी साहित्य यांतून विजयपूर, राय राजधानी, दक्षिण वाराणसी, बिज्जनहळ्ळी, बिज्जपूर, मुहम्मदपूंर इ. भिन्न नामांतरे आढळतात. पूर्वी या जागी सात खेडी होती व तेथेच यादवांनी हे नगर वसविल्याचे सांगितले जाते. या सात खेड्यांपैकी बिजनहळ्ळी खेड्यावरून या नगराला विजापूर हे नाव पडल्याचे म्हणतात. नगराच्या परिसरातील काही देवालयांत चालुक्य व यादव वंशातील राजांचे शिलालेख आहेत. आर्क किल्ल्याच्या पूर्वद्वाराजवळील विजयस्तंभाताल लेखात विजयपूर असा स्पष्ट उल्लेख आहे. हा स्तंभ सातव्या शतकातील असावा, असे तज्ञांचे मत आहे.त्यावरून विजयपूर हे त्याचे नाव असावे असे दिसते. 'विजयपूर' या नावाचा उल्लेख चालुक्य राजा दुसरा जयसिंह (कार. १०१५-१०४३) याच्या इ. स. १०३६ व्या कोरीव लेखात तसेच नागचंद्रानी लिहिलेल्या इ. स. ११०० मधील मल्लिनाथपुराण या कन्नड चंपूकाव्यात आढळतात. त्यावरून इ.स. ११ व्या शतकात वा तत्पूर्वी विजयपूर हे नाव प्रचारात असावे. पुढे विजयपुर या संस्कृत शब्दाचे अपभ्रष्ट वा संक्षिप्त रूप विजापूर झाले असावे.

येथे आढळलेल्या बहुविध अवशेषांवरून विजापूर जिल्ह्यांत इतिहासपूर्व काळात मानवी वस्ती असावी. त्यानंतर चालुक्यांपर्यंतचा याचा इतिहास अस्पष्ट असून पौराणिक दंतकथा-वदंतांनी भरला आहे. चालुक्यांनी बादामी येथे राजधानी केल्यापासून मुसलमानांच्या आगमनापर्यंत या प्रदेशावर पश्चिम चालुक्य, राष्ट्रकूट, कल्याणी चालुक्य, होयसळ आणि यादव अशा विविध वंशांनी राज्य केले. त्यांच्या कोरीव लेखांतून त्यांच्या कोरीव लेखांतून तत्कालीन राजकीय परिस्थितीची कल्पना येते. दुसरा अलाउद्दीन अहमद (कार. १४३६-१४५८) याच्या वेळी त्याचा भाऊ महमूदखान याने विजयानगच्या मदतीने विजापूर आणि अन्य काही गावे घेऊन अयशस्वी बंड केले. विजापूर ही जहागीर या काळात महंमद गवानच्या देखरेखीखाली होती. बहमनी राज्यांचे पाच शाह्यांत विभाजन झाले, तेव्हा यूसुफ आदिलखान (कार. १४८९-१५१०) याने आदिलशाहीची स्थापना करून विजापूर ही आपली राजधानी केली. औरंगजेबाने १६८६ मध्ये आदिलशाही खालसा केली. १७२३ पर्यंत विजापूरवर मोगलांचा अंमल होता. पुढे ते हैदराबादच्या निजाम-उल् मुल्कच्या अखत्यारीत गेले (१७२३-१७६०). निजामाने हा भाग तोडून पेशव्यांना दिला. पेशवाईच्या अंतापर्यंत (१८१८) ते मराठ्यांच्या अधिसत्तेखाली होते. अव्वल इंग्रजी अमदानीत नवीन कलदुगी (विजापूर) जिल्हा इ. स. १८६४ मध्ये करण्यात आला आणि इंडी, हिप्परगी, विजापूर, मंगोली (बागेवाडी), मुद्देबिहाळ, बागलकोट, बादामी व हुनगुंद हे तालुके त्यात अंतर्भुत करण्यात आले. त्यावेळी हा जिल्हा मुंबई इलाख्यात होता. पुढे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जमखंडी, औंध, मुधोळ, कुरुंदवाड या विलीव संस्थानांतील काही खेडी त्यात समाविष्ट करण्यात आली आणि मुघोळ व जमखंडी हे दोन स्वतंत्र तालुके त्यात समाविष्ट झाले. राज्यपुनर्रचनेनंतर (१९५६) हा भाग मुंबई द्वैभाषिक राज्यात समाविष्ट झाला आणि संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर (१९६०) तो म्हैसूर (कर्नाटक) राज्यात अंतर्भूत करण्यात आला.

आधुनिक विजापूर ही धान्याची मोठी बाजारपेठ असून ते एक औद्योगिक शहर आहे. ते महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्र प्रदेश राज्यांच्या सीमेलगत असल्यामुळे या राज्यांतील ग्रामीण भागांतून येथे खरेदीसाठी मोठा जनसमुदाय जमतो. तेथे अनेक लोक ऐतिहसिक वास्तू पाहण्यासाठी येतात. वास्तूंमुळे पर्यटकांचे ते आकर्षण बनले आहे. जिल्हात व शहरात हातभाग उद्योग मोठ्या प्रमाणात असून त्यांपैकी इलकल (इरकल) साड्या आणि गुलडेगुड खण तयार करण्याचे हातमाग आहेत. यांशिवाय उदबत्ती आणि साबण तयार करण्याचे लघुउद्योग सर्वत्र चालतात. कातडी कमाविणे आणि पादत्राणे बनविणे हा व्यवसाय कापड उद्योगाखालोखाल चालतो. हा परंपरागत व्यवसाय करणाऱ्यांना समगर आणि मोचिगर म्हणतात. शहरात वस्त्रोद्योग, तेलाच्या गिरण्या इ. मोठे व्यवसाय आहेत. विजापुरात वेगवेगळ्या बँक शाखा आहेत. युनिअन बँक ऑफ विजापूर अँड सोलापूर ही सर्वात जुनी स्थानिक पातळीवर कार्यरत असलेली बँक १९६४ मध्ये सांगली बँकेत विलीन करण्यात आली. येथे उपायुक्तांचे कार्यालय असून त्याच्या अखत्यारीत जिल्ह्यातील सर्व महसूल विभाग येतात. शहराच्या पाणी, आरोग्य इत्यादी सुविधा नगरपालिका (स्था. १८५४) पुरविते. नगरपालिकेची तीन रूग्णालये आहेत. कुष्ठरोग निवारण (स्था. १९२८) ही जिल्ह्यातील अशा प्रकारची एकमेव संस्था आहे. याशिवाय शहरात शासकीय नागरी रूग्णालये, अनेक खासगी दवाखाने आणि रूग्णालये आहेत. शहरात नगरपालिकेची नेताजी पार्क आणि कौजलगी उद्याने, पुरातत्त्वीय खात्याची गगन महाल आणि सिकंदर ही उद्याने आहेत. शहरात मुलींची दोन माध्यामिक विद्यालये, मुलांसाठी नऊ माध्यमिक शाळा, एक संस्कृत पाठशाळा (स्था.१९०८), दोन अरेबिक विद्यालये (उर्दू शाळा), दोन संगीत विद्यालये, दोन शिक्षण प्रशिक्षण विद्यालये, सैनिक विद्यालय, शासकीय तंत्रनिकेतन, आयुर्वेद महाविद्यालय, वाणिज्य महाविद्यालय, विजय महाविद्यालय (कला व शास्त्र) इ. शैक्षणिक संस्था आहेत. वास्तुकला-चित्रकला इत्यादी:विजापूर जिल्हा हा हिंदू आणि इस्लामी वास्तुशिल्पकला यांचे आगर मानण्यात येतो.

आठव्या शतकापासून चौदाव्या शतकाअखेर विजापूरच्या विस्तीर्ण पट्ट्यात फारसे बांधकाम झाले नाही, मात्र आदिलशाही काळात इस्लामी वा मुस्लिम वास्तुकलेत मोलाची भर पडली आणि मशिदी दर्गे, महाल वा प्रासाद अशा तीन प्रकारच्या इमारती बांधण्यात आल्या. यांपैकी सु. वीस दर्गे आणि तेवढेच महाल सुस्थितीत अवशिष्ट असून मशिदींचे प्रमाण तुलनात्मक दृष्ट्या कमी आहे. येथील बहुतेक वास्तू एकवर्णी पिंगट, स्थानिक वालुकाश्मात बांधलेल्या आहेत. राजधानीच्या दृष्टीने विजापूरचा प्रदेश सपाट वैराण व नदीहीन असा होता, त्यामुळे राजधानीसाठी हे ठिकाण

योग्य नव्हते. संरक्षणाच्या दृष्टीने यूसुफ आदिलखानाने आर्क नावाचा मातीचा किल्ला शहराच्या मध्यभागी बांधला. पहिल्या आदिलशाहने त्याभोवती सु. १० किमी. घेराची दगडी तटबंदी बांधली. त्याला ९६ बुरूज व सहा मोठे दरवाजे ठेवले. त्यांची नावेही अलीपूर, बहमनी, शहापूर, मक्का, फत्तेह अशी ऐतिहासिक ठेवण्यात आली. त्या दरवाज्यांच्या आत दुसरा दरवाजा अशी संरक्षणात्मक ववस्था करम्यात आली. दरवाज्यावर सज्जा आणि दोन्ही बाजूंस टेहळणीच्या दृष्टीने दोन वर्तुळाकार मनोरे बांधण्यात आले. या तटाभोवती सु. १२-१५ मीटर रूंदीचा खंदक खणण्यात आला. किल्ल्यात आसार महाल, आनंद महाल, आरसे महाल, चिनी महाल, सातमजली महाल, गगन महाल, मक्का मशीद, चिंदडी मशीद इ. खास इमारती होत्या. त्यांतील फारच थोड्या सुस्थितीत आहेत. मक्का मशीद मक्केतील सुप्रसिद्ध मशिदीची प्रतिकृती असून 'इब्राहिम रोझा' कबर (१६१५): विजापूरची प्रसिद्ध वास्तू.तिच्यातील कमानी व काही स्तंभ दगडी आहेत, मात्र चिंदडी मशीद चुनेगच्चीत बांधलेली आहे. पाण्यासाठी एक विस्तीर्ण तलाव बांधण्यात आला होता. किल्लाच्या पडकोटात एक श्रीनृसिंहमंदिर असून ते जागृत स्थान मानले जाते. याशिवाय विजापूरमधील गोलघुमट, जुम्मा मशीद, ताजबावडी, अली रोझा, जोड घुमट, करीमुद्दीन मशीद, मलिक इ.मैदान तोफ, लांडाकसाब तोफ, चांदबावडी, इब्राहिम रोझा कबर मोती घुमट, अमिन दर्गा इ. वास्तु-वस्तु प्रसिद्ध असून त्यांपैकी जुम्मा अथवा जामी मशीद, इब्राहीम रोझा, गोलघुमट आणि मेहतर महाल या इमारती इस्लामी वास्तुकलेच्या प्रातिनिधिक असून यांव्यतिरिक्त विजापुरात अनेक लहान-मोठ्या तत्कालीन वास्तू आहेत.

जुम्मा मशीद किल्ल्याच्या पूर्वेस सु. एक किमी.वर असून तिचे बांधकाम अली आदिलशाहने तालिकोटच्या विजयानंतर इ. स. १५७५ मध्ये केले. ही भव्य असून तिचे प्रमुख सभागृह ६८×३५ मी. क्षेत्रफळाचे आहे. तीत प्रार्थनेसाठी एकावेळी अडीच हजार माणसे बसू शकतात. हिच्या रचनेत असंख्य कमानी असून तिच्या मुख्य मिहरापाचे रंगकाम आकर्षण आहे. मशिदीवरील घुमट लहान असून सुबक आहे. तिचे बांधकाम पूर्ण झालेले नाही. तिच्या प्रवेशद्वाराचे काम औरंगजेबाचे पूर्ण केले.

पहिल्या इब्राहिम आदिलशाहने बांधलेली इब्राहिम रोझा ही त्याची कबर शहराच्या तटाबाहेर सु. एक किमी. वर पश्चिमेस आहे. तिचे मधले दालन चौरस असून त्याची १७.५×१७.५ मी. लांबी-रुंदी आहे. तिच्या पडवीत कमानीच्या दोन रांगा आहेत. घुमटाभोवती अनेक मीनार असून छत अगदी साधे सपाट आहे. कमानी व भिंतीवर नक्षीकाम आहे. कबरीसमोर एक मशीद आहे. तिच्या कमानी व मीनार नक्षीमुळे सुबक दिसतात. हिच्या दर्शनी भागात, दगडी साखळ्या लोंबताना दिसतात. त्या एकेक स्वतंत्र पाषाणखंडातून कोरून सजावट इस्लामी शिल्पकलेतील लक्षणीय प्रगती दर्शवितात. एकाच तटबंदीयुक्त प्रांगणात (१२० × ५१ मीटर) कबर आणि मशीद या दोन वास्तू शैलीकरण आणि भारदस्तपणा यांबाबतीत तोल सांभाळतात.

तिसरी महत्त्वाची व जगप्रसिद्ध इमारत म्हणजे मुहम्मद आदिलशाहची कबर-गोलघुमट. तिचे चार स्वतंत्र भआग आहेत. कबर नगारखाना, मशीद आणि धर्मशाळा वा अतिथिगृह. नगरखान्यात अलीकडे वस्तुसंग्रहालय केले आहे. तिचे बांधकाम सु. ३३ वर्षे चालू होते. ह्या वास्तूचा आराखडा चौरस असून प्रत्येक बाजू ४३.५ मी. आहे आणि चारी कोपऱ्यांत अष्टकोनी सातमजली मनोरे आहेत. त्यांच्यावर लहान घुमट आहेत. संपूर्ण वास्तूची उंची सु. ६८ मी. असून तिचे क्षेत्रफळ सु. १, ७०३.५० चौ. मी. आहे. माथ्यावर मध्यभागी प्रचंड घुमट आहे घुमटाच्या खाली दालन असून या भव्य दालनाच्या सभोवती टोकेरी कमानी चौकटीच्या साच्यात शिस्तबद्ध बसविल्या आहेत. त्यामुळे वास्तूची लयबद्ध स्पष्टपणे जाणवते. त्यावर सभोवती सव्वातीन मीटरचा सज्जा असून तिथे उभे राहून बोलले असता १०-१२ प्रतिध्वनी उमटतात. या ठिकाणीच प्रतिध्वनींचा नाद चमत्कार अनुभवावयास मिळतो. म्हणून त्यास 'बोल घुमट' असेही म्हणतात. खालच्या दालनात चबुतऱ्यावर मुहम्मद आदिलशाह, त्याच्या दोन बेगमा, रंभावती (वारांगना), मुलगी व नातू थडगी आहेत. प्रत्यक्षात खरी थडगी या थडग्यांखाली आहेत. ह्या वास्तूत भव्यता आहे पण कुठेच कलाकुसर नाही. ती जगातील एक भव्य इमारत आहे.

या धार्मिक वास्तूंव्यक्तिरिक्त काही धर्मातीत अशा इमारती आहेत. त्यांपैकी काही प्रासाद जमीनदोस्त झाले असून गगन महाल, मेहतर महाल हे प्रासाद अवशिष्ट आहेत. गगन महाल इ. स. १५६० मध्ये बांधण्यात आला. त्याचा हेतू प्रामुख्याने राजवाडा आणि मंत्रिमंडळाच्या बैठकीसाठी होता. ही ४०×२५ मीटरची आयाताकार वास्तू असून तिचे दोन स्वतंत्र विभाग आहेत. एक उघडा समोरचा दुमजली मंडप आणि दुसरा त्याच्या पाठीमागे एक सभागृह व लहान खोल्या. मेहतर महालातील सूक्ष्म, अनवट वास्तुशिल्पीय कोरीव कामआणि आकारिक घडण यांत हिंदूंच्या वास्तुकलेतील आकारिक घटक आणि शिल्पवैशिष्ट्ये यांचे संयोगीकरण झाले आहे. आर्क किल्ल्यात आनंद महालापासून जवळच सुभेदार करीमुद्दीन याने रेवय्या नावाच्या कारागिराकडून बांधून घेतलेली एक मशीद आहे. ती 'करीमुद्दीन मशीद' म्हणून ख्यातनाम असून सर्वांत जुनी इमारत आहे. ताजबावडी आणि चांदबावडी च्या स्मरणार्थ इ. स. १५७९ साली बांधली. अमीन दर्गा शहापूर द्वाराच्या पश्चिमेला असून ख्वाजा अमीरुद्दीनच्या स्मरणार्थ बांधला आहे. हे विजापुरातील मुसलमानांचे अत्यंत पवित्र स्थान मानले जाते. याशिवाय मलिक-इ-मैदान व लांडाकसाब या दोन मोठ्या तोफा असून त्यांपैकी लांडाकसाब तोफ ५.३४ मी. लांब असून तिचे वजन ४९ टन असावे. मलिक-इ-मैदान सु. साडेचार मीटर लांबीची ओतीव तोफ मक्का व शहापूर दरवाजा यांमधील तटावर ठेवलेली आहे. तिला 'मुलुख मैदान' असेही म्हणतात. वरील मशिदी, कवरी व तोफांव्यतिरिक्त कितीतरी लहान-मोठ्या प्रेक्षणीय इमारती शहरात आहेत. त्यांपैकी अंडू मशीद ही दुमजली असून हिच्यावरील मुख्य घुमट आणि मीनारांवरील लहान घुमट अंडाकृती असल्यामुळे तिला अंडू मशीद हे नाव प्राप्त झाले आहे.

विजापूरच्या इस्लामी वास्तुकलेत स्तंभांचा वापर अल्प प्रमाणात केला असून त्यांची जागा दोन कमानींमधील दगडी स्तंभांनी व्यापली आहे. येथे टोकेरी कमानींचा वापर सर्रास केला आहे. या नमुनेदार विजापुरी कमानी चार मध्याभागात केंद्रित झालेल्या प्रकारच्या आहेत आणि चौकटीच्या साच्यात शिस्तबद्ध बसविल्या आहेत. या वक्राकार कमानींमुळे एक लयबद्धता निर्माण झाली आहे, ती विजापूर वास्तुशैलीची खास निर्मिती होय. बांधकामात छजांचा अलंकरणासाठी वापर केला असून इमारतीची प्रलंबता आणि आकारमानानुसार त्याचा चपखल उपयोग केलेला आहे.

विजापूरची सुलेखनकला आणि चित्रकला, विशेषतः लघुचित्रशैली, यांना इस्लामी कलेत वेगळे स्थान आहे. आदिलशाहीतील सुलतानांनी दक्षिणेकडील हिंदू कैदी आणि निर्वासित यांचा कलेतील नवनिर्मितीसाठी फार मोठ्या संख्येने उपयोग करून घेतला. त्यांतून हिंदू संस्कृतीचा प्रभाव मुस्लिम कला आणि संस्कृत भाषा यांवर अभावितपणे पडला. हिंदूंची प्रणयकाव्ये, संगीत आणि फलज्योतिष यांवर आधारलेली त्यांची लघुचित्रे हा विजापूरमधील राज्यकर्त्यांचा मोठा शौकच बनला. बहुतेक सत्ताधीश कलाकार होते किंवा कलेचे भोक्ते होते. त्यांनी या दोन कलांना प्रोत्साहन दिले. विश्वकोशसदृश नुजुम-उल्-उलम या ग्रंथात (१५७०) सुरुवातीच्या काळातील सुलेखन आणि लघुचित्रे आढळतात. ही वेगवेगळ्या आकाराची असून ती सु. ८७६ भरतील. हा ग्रंथ डब्लिनच्या चेस्टर बिट्टी ग्रंथालयात असून त्यात मीना पक्षी हातावर घेतलेल्या एका तरुणीचे (योगिनी) चित्र अप्रतिम आहे. या चित्रांतील कलापरंपरांचा मूलस्रोत एतद्देशीय प्रामुख्याने विजयानगर- असून त्याच्या शैलीत इराणी छटा दृग्गोचर होते. दुसरा इब्राहिम आदिलशाह हा उत्तम चित्रकार होता. त्याने केलेली व त्याच्या वेळची अनेक व्यक्तिचित्रे व लघुचित्रे उपलब्ध असून ती वस्तुसंग्रहालयात व खाजगी संग्रहालयातील आढळतात. हळूहळू विजापूरची लघुचित्रशैली मूळ रूप गमावत असल्याची चिन्हे नंतरच्या काळात दिसतात. रागमाला चित्रांच्या मूलस्थानाविषयी विद्वानांत मतभेद आहेत तथापि त्यांचे उत्पत्तिस्थान (उगमस्थान) दक्षिण भारतात आहे, हे वादातीत आहे. डॉ. मोतीचंद्र यांच्या मते यांचे मूलस्थान विजापूर असून दुसरा इब्रहिम आदिलशाही हा संगीत रागदारीचा उत्तम जाणकार होता आणि चित्रकारही होता. संगीतावरील त्याचे किताब ए नवरस हे पुस्तक प्रसिद्ध आहे. दिल्लीच्या राष्ट्रीय संग्रहालयातील हिंदोला रागाचे एक चित्र हे याचे उत्तम उदाहरण होय. सोळाव्या शतकात या कलेवर मोगल कलेचा प्रभाव वाढला. जहांगीर बादशाहने भेट म्हणून आपले व्यक्तिचित्र आदिलशहाकडे पाठविले होते (१६२०). आदिलशाहच्या कारकीर्दीत या कलेवरील यूरोपीय प्रभावही वाढला होता. आसर महालमधील अवशिष्ट भित्तिचित्रांवरून असे दिसते की काही इटालियन कलाकार विजापूरच्या दरबारी वास्तव्य करून असावेत.

## अहंमदनगरची निजामशाही, (सन १४८९-१६३७),

### अहंमद निजामशहा, (सन १४८९-१५०८) —

विजयनगरास तिमाप्पा बहिरू (बहिरव?) नामक एक ब्राह्मण होता. मलीक नाईब निजामुल्मुल्कू बहिरी हा त्या तिमाप्पाचा मुलगा होय. अहंमदशहाच्या फौजेनें विजयनगरच्या राजाबरोबर लढाई करून त्या मुलास कैद करून आणिलें, पुढें तो मुसलमान झाला. महंमद- शहाच्या पदरी महंमद गवानच्या वेळेस हा उदयास आला. त्याचा मुलगा अहंमद ह्यानें अहमदनगरच्या निजामशाहीची स्थापना केली. स्वतंत्र होण्यापूर्वी त्यानें कित्येक किल्ले घेतले, त्यांत शिवनेरी किल्ला होता. त्यांतच त्यास पुष्कळ धन सांपडले. नंतर त्यानें चंदनवंदन, लोहगड, तोरणा, वगैरे दक्षिणचे बहुतेक किल्ले काबीज केले आणि राजापुरापर्यंत कोंकण प्रांत जिंकिला. तो जुन्नरास राहत असे. त्यानें आपल्या मुलखाची व्यवस्था इतकी उत्तम ठेविली होती कीं, त्याच्या राज्यांत एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत काठीला सोनें बांधून खुशाल फिरावें. त्याच्या हुकमाशिवाय राज्यांत पान देखील हालत नसे. बहामनी शहानें त्याजवर स्वारी केली, तींत त्या शहाचाच पराभव झाला. त्याचा शिरजोरपणा कमी करण्यासाठी शहानें पुष्कळ उपाय केले; पण त्यास यश आलें नाहीं. अखेरीस अहंमद हा निजामशहा ह्या नांवानें स्वतंत्रतेनें राज्य करूं लागला. दौलताबाद व जुन्नर ह्यांचे दरम्यान बिंकर म्हणून खेडें होतें, तें त्यास सोयीचे वाढल्यावरून तेथे अहंमदनगर नांवाचें शहर त्यानें बसविलें (सन १४९४). ह्या वेळेस मराठे लोक दक्षिणेत पुंडाई करू लागले होते. अहंमद निजामशहानें दौलताबादचा किल्ला वेढा घालून घेतला. पुढें अनेक पराक्रम करून हा सुलतान सन १५०८ सालीं निवर्तला. अहंमदशहाच्या अंगचे सद्‌गुण वर्णन करण्यास आपण असमर्थ आहों, असें फेरिस्ता म्हणतो. त्यानें एकपत्नीव्रत पाळिले. द्वंद्वयुद्ध करून तंव्यांचा निकाल करण्याची चाल ह्यानेंच दक्षिणेंत पाडिली. राजाचे अनुकरण करून सर्व लहानथोर लोकांत खेड्यापाड्यांतूनसुद्धां द्वंद्वयुद्धाची अभिरुचि बाढून, जिकडे तिकडे तलवारीचा पट्टा व बोथाटी खेळण्याचे आखाडे स्थापन झाले.

### बुऱ्हाण निजामशहा, (सन १५०८-१५५३) —

अहंमदशहाचा मुलगा बुऱ्हाण हा सात वर्षांचा असतांना गादीवर बसला. मखमलखान नामक हुशार व राज्य-कार्यधुरंधर प्रधानाच्या देखरेखीखालीं बु-हाणशहाचा अभ्यास फार चांगला झाला दहा वर्षांचा असतांच तो फारशी भाषेमध्यें सुरेख निबंध लिहीत असे. विजापुरचा राजा इस्मईल आदिलशहाच्या मुलीशीं याचे लग्न झालें. पुढें इस्मईलशीं बुन्हाण- शहाचें युद्ध होऊन, बुदाणचा पराभव झाला. इमादशहाशीं युद्ध करूनही वुन्हाणचाच पराभव झाला. शेवटीं सर्व सुलतानांचा तह ठरला. कंबरसेन नांवाचा ब्राह्मण बुन्हाणशहाच्या दरबारों फार दिवस मुख्य प्रधानाचं काम पाहत होता. त्यानें मोठ्या हुशारीनें कारभार केला. एकदां गुजराथचा बहादूरशहा व बुन्हाण निजामशहा ह्यांच्या भेटी मोठ्या समारंभानें गुजराथेंत होऊन दोघांचा स्नेह दृढ झाला. ह्या कारकीर्दीत मराठे लोक प्रसिद्धीस येऊं लागले. संभाजी चिटणीस ह्यास प्रतापराव असा किताब मिळून त्याची परराज्यांतील वकिलातीच्या कामावर नेमणूक झाली. शद्दा ताहीर नांवाचा एक विद्वान् मुत्सद्दी बुन्हाणशहाच्या पदरीं होता. त्याच्या सल्ल्यानें शहानें आपल्या मुलखांत जबरदस्तीनें शिया धर्माची स्थापना केली, त्यामुळे सुनी लोकांनीं दंगा चालविला आणि गुजराथ, खानदेश व विजापुर येथील राजै सुनी धर्माचा प्रसार करण्याच्या हेतूनें एकत्र झाले. त्या वेळी बुद्दाणशहानें दिल्लीच्या हुमायून बादशहाकडे मदत मागितली. पण हुमायून धांदलींत असल्यामुळें त्यानें मदत दिली नाहीं. हे धर्मसंबंधी तंटे फार वाढले. विजापुरच्या आदिलशहाशीं दोन वेळ युद्ध होऊन त्यांत बु-हाणशहाचा पराजय झाला. विजयनगरच्या राम- राजाची मदत घेऊन त्यानें विजापुरच्या राज्यावर अनेक स्वाऱ्या केल्या, येणें- प्रमाणें बुऱ्हाणशहाची बहुतेक कारकीर्द लढण्यांत गेली. ४७ वर्षे राज्य करून बुन्हाणशहा सन १५५३ त मरण पावला. त्यास पांच पुत्र होते. डोंगरी मुलखांतून राहणारे मराठे लोक प्रजेस त्रास देत, त्यांचा ह्या कारकीर्दीत

बंदोबस्त होऊन त्यांस मोठमोठ्या हुद्द्यांच्या जागा मिळाल्या. ह्या कामीं त्याच्या ब्राह्मण दिवाणाची त्यास फार चांगली मदत झाली.

**हुसेन निजामशहा, (सन १५५३-१५६५) —**

हा सुलतान गादीवर बसल्याबरोबर भावाभावांत तंटे उपस्थित झाले. विजापुर, गोवळकोंडे व विजयनगर येथील राजे एकत्र होऊन अहंमदनगरवर चालून आले आणि त्यांनी त्या राज धानीस वेढा घातला. तेव्हां हुसेनशहानें सवाशीं तह केला. तरी हे तंटे पुष्कळ दिवस मिटले नाहींत. विजयनगरचा राजा ह्या वेळेस फार प्रबळ झाला होता. सर्व मुसलमान राजांस तो त्रास देऊ लागला. त्याचा समूळ उच्छेद करावा, या हेतूनें ते मुसलमान राजे एकत्र झाले. सन १५६५ सालीं तालिकोट येथे हिंदु ५ मुसलमानांची जंगी लढाई झाली, तिचे वर्णन विजयनगरच्या इतिहासांत यावयाचें आहे. तींत हिंदूंचा पाडाव होऊन मुसलमानांचा अंमल थेट दक्षिणेपर्यंत चालू झाला. ह्या वेळेसच पराक्रमी बादशहा अकबर दिल्लीहून सर्व हिंदुस्थान आक्रमीत चालला होता. तालिकोटच्या लढाईत हुसेन निजामशहाच्या तोफखान्यानें उत्तम कामगिरी बजाविली. त्याचे जवळ ६०० तोफा असून, त्यांजवर चलीबी हमीखान नामक एक मुसलमान सरदार मुख्य होता. हा आशिया-मायनरांतील राहणारा असून, युरोपां- तील लष्करी खात्यांत तोफखान्याचें काम शिकून निपुण झाला होता. तालिकोटच्या लढाईत रामराय मारला गेला आणि हिंदूंचें सैन्य पळून गेलें, लढाईहून परत आल्यावर हुसेन निजामशहा आपल्या वयाच्या २४ वे वर्षी मरण पावला. त्यास पुष्कळ मुलें होतीं.

**मूर्तजा निजामशहा, (सन १५६५-१५८६) —**

हा गादीवर बसला, तेव्हां लहान असल्यामुळे त्याची आई खुंजा सुलताना राज्यकारभार पाहत असे. हिनें मोठमोठे सरदार दूर करून त्यांच्या जागीं स्वतःच्या आप्तांस कामें दिलीं. विजयनगरचें जिंकलेलें राज्य कसें वांटून घ्यावें, ह्याविषयीं कलह उत्पन्न होऊन शेवटीं मुसलमानी राजांच्या आपसांत लढाया सुरू झाल्या. त्याच संधीस राणीस कारभारांतून काढण्याचा गुप्त बेत झाला. तो राणीस कळून, तिनें त्यांत सामील असलेल्या मंडळीस पकडून कैदेत टाकिलें. सन १५६९ त मूर्तुजानें राज्यकारभार आपल्या हातीं घेतला. त्यानें विजापुरच्या किश्वरखान नामक सरदारावर स्वारी करून त्यास ठार मारिलें; आणि विजापुरचा धारूर * किल्ला हस्तगत केला. नंतर त्याचा विजापुर दरबाराशीं तह्र झाला. ह्या समयास पोर्तुगीज लोक हिंदुस्थानांत येऊन ते पचिम किनारा बळकावीत चालले होते. रेवदंब्यास त्यांनी वेढा घातला आणि निजामशहाच्या सरदारांस दारूच्या बाटल्या नजर करून त्यांनी तेथे प्रवेश केला. ह्याच सुमारास वऱ्हाडच्या इमादशहास दूर करून, तें राज्य तोकलखान नामक सरदार बळकावून बसला होता, सबब तें व बेदरचें राज्य अशीं दोनही जिंकावी, असा निजामशहा व विजापुरचा आदिलशहा यांनी गुप्त बेत करून, ते त्या उद्योगास लागले. मुर्तुजाचा जंगीझखान नामक हुशार दिवाण होता, त्याची ही सर्व खटपट होती. वाड प्रांतावर स्वारी करून मूर्तुजाने तोफलखान व इमादशाही घराण्याचा वंशज ह्यांस ठार मारून वन्हाडचे राज्य आपल्या राज्यास जोडिलें. खानदेशचा सुलतान मिरन महंमदखान फरूकी व्यानें ह्या कृत्यास प्रतिबंध केल्यामुळे, त्याचाही मूर्तुजानें पराजय करून त्याजकडून खंडणी घेण्याचे ठरविलें. बेदरचें राज्य जिंकण्याचें जंगीझखान ह्याच्या मनांत फार होतें. तेव्हां बेदरच्या शहानें जंगीझखानास लांच वगैरे देऊन वश करण्याकरितां आपला वकील पाठविला. पण जंगीझखान पक्का राजनिष्ठ असल्यामुळे तो ह्या लालुचीस वश झाला नाहीं. तेव्हां बेदरच्या वकिलानें हरयुक्ति करून मूर्तुजा निजामशहाच्या मनांत जंगीझखानाविषयीं वाईट भरविलें, तेव्हां मुर्तुजानें विष- प्रयोग करून त्या वजिरास ठार मारिलें. पुढें खरा प्रकार शहाच्या नजरेस येऊन त्यास कृतकर्माचा अत्यंत पश्चात्ताप झाला. आपल्यास खरें खोटें समजण्याची शक्ति नाहीं, त्या अर्थी आपण राज्य करण्यास नालायक आहों, असें समजून भरदरबारांत त्यानें सर्व राज्यभार चार हुशार कामगारांवर सोंपविला आणि आपण एकांतवासांत जाऊन ईश्वरभजनांत काल घालवू लागला. साहेबखान नामक एका इसमाशिवाय दुसऱ्या कोणासही तो भेटत नसे. हा साहेबखान पुढें फार अनीतीचें आचरण करून लोकांवर जुलूम करूं लागला. तेव्हां दरबारच्या मंडळींनीं त्यास ठार मारिलें. पुढे सलाबतखान नामक सरदार मुख्य दिवाण झाला. पण ह्या वेळेपासून शहास बहुतेक वेड

लागल्यासारखें झालें होतें. तो आपल्या स्वतःच्या मुलाचा प्राण घेण्यास टपला होता. ह्या कामीं त्याचे दिवाण त्यास मदत करीनात, म्हणून त्यानें त्यांस वारंवार बदलिलें. शहाचा मुलगा मिरन हुसेन ह्यास तख्तावर स्थापण्याचा मुत्सद्दी मंडळीने घाट करून त्यास शहरांत आणिलें, त्यानेंच शहास ठार मारिलें, (सन १५८६).

**मिरन हुसेन व इस्मईल निजामशहा, (सन १५८६ - १५९१) —**

मिरनची बहुतेक कारकीर्द दरबारच्या भानगडींतच निघून गेली. तो स्वभावानें अत्यंत क्रूर होता. त्यांतही दक्षणी व परदेशी ह्या दोन पक्षांमध्यें पुनः तंटे उद्भवून विकोपास गेले, दक्षणी लोक शिरजोर होऊन त्यांनी परदेशी लोकांची कत्तल केली. मीर्झाखान नामक वृजिराचाही त्यांत वध झाला. पुढें बंडवाल्यांनीं शहाचा वध करून इस्मईल नामक दुसऱ्या इसमास तख्खावर बसविलें, (सन १५८८).

इस्मईल हा मूर्तुजाचा धाकटा भाऊ व बुन्हाण निजामशहाचा मुलगा होता. हा बुन्हाण अकबर बादशहाच्या आश्रयास जाऊन राहिला होता. इस्मईल हा लोहगडा- वर कैदेत होता. इस्मईल राज्य करूं लागला, तेव्हां जमालखान नामक दक्षिणी पक्षाच्या वजिराच्या हातांत बहुतेक सत्ता होती. हा जमालखान मइदी पंथाचा होता. महदी पंथ मूळ चमत्कारिक रीतीनें निघाला. इन्फी पंथांतील सय्यद महंमद नांबाचा एक इसम लोकांस असें सांगू लागला की 'मला एक नवीन पंथ काढण्यासाठी ईश्वरानें प्रेरणा करून पाठविलें आहे. तो इसम महूदी असें नांव धारण करून आपल्या नवीन पंथाचा प्रसार करूं लागला. हिंदुस्थानचे पुष्कळ मुसलमान ह्या पंथाचे अनुयायी बनले. त्यांपैकी जमालखान हा महूदी पंथाचा कट्टा अनुयायी होता. सर्व गोष्टी अनुकूल असल्यामुळे त्यानें ह्या पंथाचा विस्तार करण्याचा झपाय्यानें यत्न चालविला. तेव्हां सलाबतखान नामक सरदाराच्या आश्रयानें महूदी लोकांस हांकून लावण्यासाठीं दुसरा एक पक्ष उत्पन्न झाला. जमालखानानें त्या पक्षांतील लोकांचा पराभव केला. सला- बतखान तर लवकरच मरण पावला, असे तंटे राजधानींत चालू असतां, शहाचा बाप बुन्हाण हा अकबर बादशहाची मदत घेऊन दिल्लीहून आला. त्यानें लढाई करून जमालखानास ठार मारिलें आणि मुलास कैद करून निजामशाहीचें राज्य काबीज केलें.

**बुन्हाण निजामशहा, [दुसरा ] (सन १५६१ - १५९४). —**

बुन्हाणशहाच्या कारकीर्दीत मागील व्यवस्थेची उलटापालट झाली. बुन्हाणशहा शियापंथी होता. त्यानें महूदी लोकांचा अत्यंत छळ केला. त्याच्या कारकीर्दीत रेवदंडा येथील पोर्तुगीज लोकांवर स्वारी झाली ती प्रसिद्ध आहे. ह्या वेळीं रोह्याचे खाडीवर कोर्लई येथे मुसलमान लोकांनी एक किल्ला बांधिला. त्या ठिकाणीं राहून ते पोर्तुगीज लोकांशीं झगडूं लागले. अखेरीस मुसलमानांचा पराजय झाला. शहा आजारी पडून लवकरच मरण पावला. नंतर त्याचा मुलगा इब्राहीम निजामशहा गादीवर बसला. हा दुर्व्यसनी होता. दरबारांत दुफळी होऊन विजापुराशीं युद्ध सुरू झाले, त्यांत शहा मारला गेला. त्यानें चारच महिने राज्य केलें, नंतर दिवाण मिआन अंजू ह्यानें अहंमद नामक एका मुलास गादीवर बसविलें.

**चांदबिबी व मोगलांशीं युद्ध, (सन १५९४ - १६००) —**

अहंमद निजामशहा हा वंशांतील खरा वारस नाहीं, असा वाद उत्पन्न झाला आणि तंटे चालु असतां वजीर मिआन अंजूनें प्रथमतः अकबर बादशहाचा मुलगा मुराद गुजराथचा सुभेदार होता, त्याजकडे मदत मागितली. मुराद फौज घेऊन आला, आणि अहंमदनगरास त्यानें वेढा दिला. तेव्हां निजामशाही बुडण्याचा प्रसंग आला. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं चांदबिबी नामक एका शूर स्त्रीनें अहंमदनगरचें संरक्षण करून दक्षिणच्या इतिहासांत आपले नांव अजरामर करून ठेविलें. सन १५६४ मध्ये विजयनगरच्या रामराजाविरुद्ध मुसलमानांचा मोठा जमाव झाला, त्याच्या पूर्वी थोडे दिवस हुसेन निजामशहानें आपली चांदबिबी नांदाची मुलगी विजापुरचा राजा अली आदिलशहा ह्यास दिली होती. त्याजबद्दल निजामशहाकडून सोलापुरचा किल्ला तिला आंदण मिळाला. अली आदिलशहा मारला गेल्यावर, त्यास संतान नसल्यामुळे त्याचा पुतण्या इब्राहीम आदिलशहा गादीवर बसला. त्याचा सर्व सांभाळ चांदबिबीकडे होता. पुढे वजिराचें व तिचें वांकडे आल्यामुळे, तिनें धिट्टाई करून वजिरास ठार मारविलें, पण जो दुसरा इसम वजीर झाला

त्यानें तीस पकडून, साताऱ्यास कैदेत ठेविलें. थोड्याच दिवसांनीं तीस सोडविण्याकरितां म्हणून कित्येक लोक बंड करून साताऱ्यास गेले. त्यांनी तिला कैदेतून मुक्त करून पहिल्या अधिकारावर स्थापिले. परंतु पुनः लवकरच तिचा सर्व अधिकार गेला. सन १५८४ या वर्षी आदिलशहाची बहीण खुजा सुलताना हिचें लग्न नगरच्या निजामशहाबरोबर झालें. त्या वेळेस मुलीस सांभाळण्यासाठीं तिची चुलती चांदबिबी अहंमदनगरास माहेरी आली, ती पुढे तेथेंच राहिली. येथपर्यंतची तिची हकीकत विजापुरच्या इतिहासांत येते.

अहंमद ह्यास चांदबिबीनें अहंमदनगरचा सुलतान असें कबूल केलें नाहीं. बहादूर नांवाच्या मुलास तख्तावर बसविण्याचा घाट करून मोगलांस अहंमदनगरांत शिरू न देण्याचा तिनें प्रयत्न चालविला. वरील अहंमदाशिवाय ह्या वेळेस आणखी तीन इसम राज्यावर आपला हक्क सांगत होते. चांदबिबी, एकलासखान, नेहंगखान हबशी व मिआन अंजू असे चार सरदार त्या चौघांचे पुरस्कर्ते झाले. ह्यांपैकी एकलासखानाचा गोदावरीनजीक मोगल फौजेनें पराभव केला. नेहंगखानानें मोगल सैन्याची फळी फोडून किल्ल्यांत प्रवेश केला, आणि तो राणी चांदबिबीस येऊन मिळाला. इतक्यांत विजापुर व गोवळकोंडा येथून अहंमदनगरच्या मदतीस फौजा रवाना झाल्या.

मोगल शहाजादा मुराद ह्यानें तीन मुख्य दरवाज्यांखालीं भुयारें खोदून तीं दारूनें भरविलीं; त्यांस ठिणगी लागतांच अहंमदनगरचा किल्ला उडून गेला असता. सुरुंगवाल्यांनी राणी व तिच्या लोकांस स्वाधीन होण्याविषयों सांगितलें, तसें न केल्यास पुढे काय भयंकर प्रसंग येईल ह्याची त्यांनीं तीस समजूत दिली. परंतु राणीनें धीर सोडला नाहीं. ती स्वतः मजुरांबरोबर काम करूं लागली आणि मोगलांनी भरलेलीं दोन भुयारें तिनें रिकामी केली. तिसरें भुयार खुलें करीत असतां त्यास कोणी बत्ती लावून दिली आणि तें उडालें, त्याबरोबर थोडासा तट पडला. त्या वेळीं राणीच्या कामगारांनी तीस पळून जाण्याची विनंति केली, पण तिनें त्यांचे न ऐकतां अंगति चिलखत चडविलें आणि हातांत तरवार व तोंडावर बुरखा घेऊन, जेथें तट पडून लोक आंत शिरत होते, तेथे तोंडाशीं उभी राहून लोकांस कापून काढूं लागली. तिचा आवेश पाहून स्फुरण चढलेले दुसरेही कित्येक लोक तिजबरोबर लढू लागले. मोगलांनी संध्याकाळीं हल्ला केला. पण ह्या आवेशी व शुर राणीपुढें इलाज न चालतां त्यांस परत फिरणे भाग पडले. त्या वेळीं एकच गदाँ उडाली. सर्व खंदक प्रेतांनी भरून गेला. पुनः पुनः मोगल वेगानें हल्ला करीत आणि दरखेपेस फार नुकसान होऊन त्यांस परत फिरावें लागे. राणीनें इतक्या अवकाशांत सर्व तट पुनः बांधिला, तरी आपला मोगलांपुढें टिकाव लागणार नाहीं, हें जाणून तिनें त्वरा करून विजापुरच्या फौजेस मदतीस बोलाविलें. तिचीं पर्ने मुरादच्या हातांत पडली. मुरादनें 'लवकर या. आम्ही सर्वांचा समाचार घेण्यास तयार आहों", असा जास्त मजकूर त्या पत्रांत लिहून ती पुढें विजापुरास पाठविलीं. त्याप्रमाणें विजापुरचा सरदार सोहलखान फौजेसह येऊन द्वाखल झाला. ह्या फौजेनें मोगलांस दाणापाण्याचा इतका तोटा पाडिला, कीं 'वन्दाड स्वाधीन करा, म्हणजे आम्ही निघून जातों', असें मुराद यानें चांदबिचीपाशीं बोलणें लाविलें. मोगलांशीं टक्कर देण्याइतकें सामर्थ्य आपणांत नाहीं, हें जाणून तिनें हें मागणें कबूल केलें आणि मुराद निघून गेला (१५९४). थोड्याच दिवसांनी सर्वांच्या मतें तिनें बहादूरशहास तख्तनशीन केलें आणि आपण सर्व कारभार पाहू लागली. अहंमद ह्यास विजापुरच्या शहानें जहागीर देऊन आपल्या पदरी ठेविलें. चांदबिबीच्या वरील पराक्रमामुळे अहंमदनगरच्या इतिहासांत तिचें नांव अजरामर झाले आहे.

चांदबीबीने महंमदखान ह्यास मुख्य वजीर नेमिलें; पण त्यानें सर्व कारभार बळकाविला. तेव्हां तिनें इब्राहीम आदिलशहाची मदत मागितली. सोहलखान फौज घेऊन आला होता, त्यानें अहंमदनगरास वेढा घातला. महंमदखान वजिरानें मोग- लांची फौज वऱ्हाडांत होती तीस परत बोलाविलें. तेव्हां इतर सर्व सरदारांनी मिळून महंमदखानास पकडून चांदबिबीच्या स्वाधीन केलें. ह्यामुळे तिचा अधिकार पूर्ववत् चाहे लागला. इकडे मोगल वऱ्हाड प्रांत घेऊन स्वस्थ बसले नव्हते. ते उत्तरोत्तर निजामशाहीचा मुलूख काबीज करीत चालले. चांदबिबीनें बोलाविल्यावरून विजापुर व गोवळकोंडे येथील राजांच्या फौजा मदतीस आल्या. येणेंप्रमाणें दक्षिणच्या मुसलमानांची एकंदर साठ हजार फौज उत्तरेच्या मोगलांशर्शी लढण्याकरितां तयार झाली. अहंमदनगरच्या निजामशाही घराण्याचीं शंभर वर्षे भरलीं. वरील उभय फौजांमध्यें तुंबळ युद्ध झालें. दोन दिवस युद्ध चालू होतें. दोनही पक्षांनीं शिकस्त केली. अखेरीस मोगलांस जय मिळाला.

ही लढाई १६-१-१५९७ रोजीं गोदावरीचे कांठीं सुर्वे सोनपेठ येथे झाली. ह्या वेळीं मोगल सरदार खानखानान व विजापुरचा सरदार सोलखान ह्यांनी आपआपल्या पराक्रमाची पराकाष्ठा केली.

विजय प्राप्त झाल्यावर मोगल सरदारांत वाद पडला. अहंमदनगरावर एकदम चाल करावी, असें मुरादचे म्हणणे होतें आणि खानखानानच्या मतें प्रथम वऱ्हाड प्रांतांतील कित्येक मजबूद ठिकाणें जिंकून घ्यावीं असें होतें. ह्यामुळे कलह माजून मुरादनें खानखानान ह्यास परत बोलाविण्याविषयीं बापास लिहिलें. तेव्हां त्यास परत बोलावून अकबर बादशहानें आपल्या मर्जीतील सरदार अबुल फज्ल ह्यास दक्षिणेंत पाठविलें. इकडे अहंमदनगरासही चांदबिबी व नेहंगखान ह्यांजमध्यें कारभारासंबंधीं तंटा सुरू झाला होता. गृहभेद असल्याशिवाय परशत्रूचा शिरकाव होत नसतो. नेहंगखानानें फौज गोळा करून अहंमदनगरावर हल्ला केला. बरसातीचे दिवस व मोगल फौज दूर आहे असे पाहून, दक्षिणच्या बंदोबस्तास जी फौज होती, तिजवर हल्ला करून बीड येथे अहंमदनगरच्या फौजेनें तिचा पराभव केला. इकडे मुराद मरण पावला आणि अकबर बादशहा अबुल फज्लूच्या बोलावण्यावरून स्वतः दक्षिणेंत बऱ्हाणपुरास आला. त्यानें आपला दुसरा मुलगा दानियाल मीर्झा व खानखानान त्यांस दक्षिणची कामगिरी दिली, (सन १५९९). तेव्हां मोगलांची फौज बिनहरकत नगरावर चालून आली. नेहंगखान जुन्नरास पळून गेला. ह्या प्रसंगीं चांदबिबीजवळ भरंवशाचे एकही माणूस नव्हतें. हमीदखान खोजा म्हणून एक तृतीयप्रकृति अधिकारी होता, त्यास काय करावें म्हणून तिनें सल्ला विचारिला. लढाई करून किल्ल्याचा बचाव करावा असें त्यानें सांगितलें. राणी म्हणाली कीं, 'प्रसंग कठीण असल्यामुळें किल्ला मोगलांस देऊन आपण बालराजासह जुन्नरास जावें.' हें तिचें भाषण ऐकून तो दुष्ट खोजा फार खवळला आणि बाहेर जाऊन लोकांस सांगत सुटला, की सुलताना ही आंतून मोगलांस सामील आहे. नंतर कित्येक दुष्ट लोकांस बरोबर घेऊन तो किल्ल्यांत शिरला आणि तिच्या महालांत जाऊन त्यानें तिचा खून केला. नंतर थोड्याच अवकाशांत मोगलांनीं किल्ल्यास खिंडारें पाडून तो सर केला, बाहदूरशहास पकडून नेऊन अकबरानें आभ्यास कैदेत ठेविलें आणि दक्षिणचा कारभार दानियालकडे दिला, (सन १६००). पुढें निजामशाहीच्या सरदारांनी बुऱ्हाण निजामशहाचा नातू, मुर्तुजा विजापुरास पणजोळीं राहत होता, त्यास आणून परिडा येथे निजामशाहीच्या तख्तावर स्थापिलें आणि कित्येक वर्षे खटपट करून ह्या घराण्याचें नांव १६३२ पावेतों कायम राखिलें.

दक्षिण हिंदुस्थानांत जीं पराक्रमी माणसें निपजली, त्यांत चांदबिबीची गणना मुख्यत्वानें आहे. तिच्यासारखीं स्त्रीरत्नें तर फारच थोडीं सांपडतील. ती स्वरूपानें सुंदर असून अल्प वयांत भर्तृवियोग झाला असतां तिनें आपलें वर्तन अखेरपर्यंत निर्मळ ठेविलें. विजापूर त्र अहंमदनगर येथील घडामोडींत स्वकर्तव्य बजावण्यास तिनें कसूर केली नाहीं. तिच्या अप्रतिम शौर्याची पारख अनेक प्रसंगीं झाली. तिचा शेवट दुःखमय झाला हें ऐकून सर्व लोक हळहळतात आणि आजतागाईत संमान- पुरःसर तिचे स्मरण करितात.

**मलिकंबराचा कारभार, (सन १६००-१६२६) —**

अहंमदनगर काबीज करून मोगल सैन्य जरी दक्षिणेंत जिकडे तिकडे पसरले होतें, तरी दोन तीन पुरुषांनीं निजामशाहीची बाजू बरीच संभाळिली. मिआन राजू व मलिकंबर हे दोघे हुशार मुसलमान मुत्सद्दी त्या संकटसमयीं निजामशाहीस लाभले. त्यांनीं दहा बारा वर्षांत बहुतेक निजामशाही मुलूख परत मिळविला. अहंमदनगरास राहणारा मोगल सुभेदार खानखानान ह्यानें त्यांजवर फौज पाठविली. तिजवर मलिकंबर चालून गेला, त्यानें मोगलांचा पराभव केला. तरी लढाईंत त्यास पुष्कळ जखमा झाल्या व प्रसंग कठीण आहे, असें पाहून त्यानें मोगलांशीं तह केला. येणेकरून मूर्तुजाशहा व इतर सरदार ह्यांच्या राजनिष्ठेविषयीं संशय उत्पन्न झाला, तरी फौज जमवून त्यानें शहास परिख्याच्या किल्ल्यांत नेऊन सुरक्षित ठेविलें. तेव्हां मिआन राजूनें तटा चालवून मलिकंबरावर स्वारी केली. त्या वेळीं मलिकंबरानें मोगलांची मदत मागितली. पण इतक्यांत म्हणजे १६०० त दानियाल मरण पावला आणि खानखानान ह्यानें राजूस मदत दिली. अशा संधीस मलिकंबरानें मोठ्या शहाणपणानें निजामशाही घराण्याचा अभिमान घरून राजूस पकडून कैद केलें, आणि बराच मुलूख मूर्तुजाच्या अंमलाखाली आणिला. निजामशाही घराण्याचा फेरिस्त्यानें लिहिलेला इतिहास

इतकाच झाला आहे. कारण ह्याच संधीस हा प्रसिद्ध व विद्वान् इतिहासकार मरण पावला, त्यानें लिहिलें आहे की, 'मलिकंबराचें वजन व वर्चस्व दिवसें दिवस वाढत आहे. सर्व राज्यकारभार तो मोठ्या हुशारीनें व दक्षतेनें चालवीत आहे. तरी मोगल बादशहा तें घशांत टाकण्यास टपून बसला असल्यामुळें तें लवकरच लयास जाईल'.

फेरिस्ता इराणांतील एका थोर कुळांत सन १५७० त जन्मला. लहानपणींच बापानें त्यास हिंदुस्थानांत आणिलें. तेव्हांपासून तो अहंमदनगरास व विजापुरास राहिला. तरुण असतांनाच त्यानें आपला इतिहास लिहिण्यास सुरुवात केली. विजापुरच्या आदिलशाहीचा इतिहास त्यानें सन १५९६ त संपूर्ण केला. निजामशाहीचा इतिहास त्यानें सन १६०७ च्या पुढें लिहिला असावा. सन १६११ च्या पुढची हकीकत त्यांत नाहीं. सबब त्या सालाच्या सुमारास फेरिस्ता मरण पावला. इतिहास लिहिण्याची आवड मुसलमानांत विशेष दिसून येते आणि जे कित्येक चांगले इतिहास मुसलमानांनीं लिहिलेले आहेत, त्यांत फेरिस्ताचा ग्रंथ मोडतो. तथापि त्यानें इतर ग्रंथांतून उतारे घेऊन आपला इतिहास सजविला, स्वतः नवीन फारसें लिहिलें नाहीं असें मत अलीकडे बनत आहे.

**वजीर मलिकंबर, (सन १५४६-१६२६) –**

मलिक ऊर्फ सीदी अंबर हा जातीचा इबसी असून पहिल्या मूर्तुजा निजामशहाचा इमानी दिवाण जो जंगीझ-खान त्याजपाशीं नोकरी करून, राज्यकारभाराच्या कामांत फार तरबेज झाला होता. पुढे चांदबिबीची मर्जी संभाळून, तिच्या आश्रयानें त्यानें कारभारांत अनेक कामें करून अनुभव मिळविला. अहंमदनगर मोगलांच्या ताब्यांत गेल्यावर दौलताबादे- पासून सहा मैलांवर खडकी नामक शहरी मोठमोठ्या हवेल्या बांधून तेथे त्यानें निजामशाहीची राजधानी केली. ह्याच शहरास पुढें औरंगजेबनें औरंगाबाद असें नांव दिलें. मलिकंबरच्या पदरीं पुष्कळ मराठे सरदार होते. सिंदखेडचे देशमुख जाधवराव व मालोजी भोसले हे सरदार पूर्वीपासून निजामशाहींत होते. अहंमदनगर व विजापुर ह्या दोन ठिकाणी लष्करी खात्यांत पुष्कळ मराठे सरदार ह्या वेळेस उदयास आले. अकबर बादशहा आणखी कांहीं वर्षे वांचता तर निजाम- शाही साफ बुडाली असती पण पुढें अकबरास कठिण समय आला. त्याचा मुलगा सलीम ह्यानें बंड केलें. तें मोडतें तों दानियाल सन १६०४ त मरण पावला, तेव्हां पुढें निराश होऊन बादशहा अकबर ता. ५-१०-१६०५ रोजीं मरण पावला. त्यानंतर जहांगीर ह्यास एकदम गादी मिळाली नाहीं. त्याचा मुलगा खुलू ह्यानें बंड केलें, तें मोडून स्वस्थता होण्यास दोन वर्षे लागलीं. मिळून सन १६०० पासून १६०६ पर्यंतचा काळ मलिकंबरास चांगला मिळाला. त्याचा त्यानें उत्कृष्ट उपयोग केला. राज्यकारभारांत त्यानें केलेल्या सुधारणांवरून त्याचें नांव दक्षिणेतील लोकांच्या तोंडीं अद्यापि निघतें. त्यानें निजामशाही मुलुखाची जमीन मापून सरकार घेण्याचे दर ठरविले, आणि उत्तरेंतील तोडरमल्लाची पद्धत दक्षिणेंत सुरू केली. ह्या कामी कित्येक मराठे सरदारांची त्यास चांगली मदत होती. साबाजी आनंदराव, शिवाजीपंत मुत्सद्दी व सखाराम मोकाशी वगैरे कित्येक गृहस्थ त्याचे मदतगार होते. उत्तर हिंदुस्थानांत तोडरमल्लाची ख्याति आहे, त्याचप्रमाणें दक्षिण हिंदुस्थानांत मलिकंबराची आहे. इजायऱ्यानें जमिनी देण्याची चाल त्यानें अगदीं बंद केली, आणि वसुलाचें काम ब्राह्मण कारकुनांच्या हातीं दिलें. शेतांची मापणी व पाहणी करून मागील कित्येक वर्षाच्या उत्पन्नाची सरासरी काढून, प्रत्येक शेतावर सरकाराचें नक्त देणें ठरविलें, आणि तें पिकाच्या मानानें कमी जास्त देण्याची सवड ठेविली. कांहीं वर्षे लोकांस सायऱ्याची माफी देऊन त्यानें नवीन जमिनी लागवडीस आणिल्या. ह्या सुधारणांमुळे अमलदारांचा रयतेवर चालत असलेला जुलूम नाहींसा झाला आणि देशांत आबादानी झाली. मलिकंबर खर्च फार करी, तरी नियमित वेळीं वसूल आल्यानें त्याची खर्चाच्या कामीं कधीं ओढाताण होत नसे. मलिकंबरानें देशांत इतकी स्वस्थता केली कीं, लवकरच मुबलक पैसा हातीं येऊन मोगलांशीं टक्कर देण्यास तो समर्थ झाला.

आरंभीं मलिकंबरानें निजामशहाच्या बचावासाठीं त्यास कांहीं काळ परिंडा, औसा, जुन्नर इत्यादि ठिकाणीं ठेविलें आणि पुढें खडकीची जागा तयार होतांच शहास दौलताबादेस आणून तेथील किल्ल्यावर बंदोबस्तानें ठेविलें आणि तीच राजधानी केली. शहाजी व जिजाबाई ह्यांचे लम ह्या निजामशहाचे मार्फतीनें दौलताबादेसच डिसेंबर सन १६०५ सालीं झालें. (मार्गशीर्ष शुद्ध ५ शके १५२७, विश्वावसु संवत्सर, इ. सं. वर्ष ८ - फलटणचे निंबाळकर ). ह्याप्रमाणें

दौलताबादचे किलथावर बहिरी निशाण फडकून 'निजामशाहीचा जम बसत चालला, तरी शहाला कर्तबगारी कांहींच नव्हती. मियान् राजू व मलिकंबर ह्या दोघांत वितुष्ट पाडून तो आपला निभाव कसाबसा करी. अहंमदनगर मोगलांचे ताब्यांत असून, तेथून खानखानान नांवाचा बादशहाचा सुभेदार निजामशाही प्रदेश हाताखाली घालण्याचा प्रयत्न करीत होता. ह्या प्रयत्नांत त्यानेंही राजू आणि अंबर ह्यांस फोडून आपल्या बाजूस आणण्याचा उद्योग चालविला. प्रथम सन १६०२ त मलीकनें राजूवर चाल करून नांदेड येथें त्याचा पराभव केला, तेव्हां राजू पळून खानखानानास सामील झाला. तेव्हां मलीकनें पुनरपि लढाईची सिद्धता करून निजामशहास बरोबर घेऊन राजूचा पाडाव केला आणि त्यास पक्कथा बंदोबस्तानें कैदेंत ठेविलें. पुढें मूर्तुजाही भलतीच गोष्ट करील असें वाटून त्यास त्यानें दौलताबादेवर कैदेदाखलच बंदोबस्तांत ठेविलें, तेव्हांपासून १८ वर्षे मलिकंबराचा कारभार निर्वेध व स्वतंत्र झाला. हळुहळू त्यानें निजामशाहीचा पूर्वीचा प्रदेश आपल्या सत्तेखालीं आणिला आणि आदिलशहा व कुत्बूाहा ह्यांशीं शक्य तेव्हां संगनमत करून सर्वांनीं मिळून मोगलांस मागें हटविण्याची तयारी चालविली. ह्या कामीं मराठ्यांच्या युद्ध-पद्धतीचाच मलीकनें अवलंब केला. प्रचंड मोगली फौजांचा निभाव ह्या पिशाच्चरूपी मराठ्यांपुढें लागणे शक्य नाहीं हा प्रकार या एकंदर प्रकरणांत सिद्ध झाला.

जहांगीर बादशहाच्या आत्मचरित्रांत दक्षिणच्या ह्या भानगडींची पुष्कळ हकीकत मिळते. त्यांत मलिकंबराचा उल्लेख अत्यंत निंद्य शब्दांनीं वारंवार केलेला आहे. अहंमदनगरावर खानखानान होता, त्यास मलिकंबरानें फौजेनिशीं जाऊन वेढा घातला. तेव्हां खानाचे मदतीस बादशहानें आपला मुलगा पर्वोझ ह्यास बऱ्हाणपुराहून सन १६०८ त निकडीनें पाठविलें. ह्या वेळीं खानखानानाचे जोडीस पुढें प्रसिद्धीस आलेला खानजहान लोदी होता. परंतु मलिकंबराचे मराठी फौजांनीं पर्वोझच्या फौजेस अवघड जागी असा कांहीं त्रास दिला कीं, ती फौज अहंमदनगरचे मदतीस येऊं शकली नाहीं. तेव्हां खान- खानानचा नाइलाज होऊन तो अहंमदनगर मलिकंबराचे हवालीं करून आपण ब-हाणपुरास परत गेला. त्यावरून खानजहान लोदीनें स्वतः बादशहास स्पष्ट असें कळविलें, की। 'खानखानानाचे हातून दक्षिणचा बंदोबस्त बिलकूल होणार नाहीं. मला तीस हजार स्वारांची मदत द्या म्हणजे मी समग्र दक्षिण जिंकून आपले हवालीं करतों.' त्यावरून सन १६०९ त बादशहानें खानखानानास परत बोलावून त्याचे जागीं खानजहानची नेमणूक केली. तथापि खानजहानचे हातून सुद्धां मलिकंबराचा प्रतिकार झाला नाहीं. सन १६१२ त मोगल फौज दौलताबादेवर चालून आली असतां, मलिकंबरानें तिचा फन्ना उडविला, तेव्हां उरली सुरली फौज जीव घेऊन बन्द्राणपुरास परत गेली. ही इकीकत खुद्द बादशहा आपल्या आत्मचरित्रांत लिहितो.

कांहीं दिवसांनीं मलिकंबरास ठार मारण्याचे प्रयत्न झाले, पण ते सिद्धीस गेले नाहींत. सन १६१२ त मलिकंबराकडील कांहीं मराठे सरदारांस फोडून मोगलांनीं आपल्या बाजूस आणिलें. बहुधा ह्यांत जिजाबाईचा बाप लखुजी जाधवराव असावा. ही फुटलेली मराठी फौज मदतीस घेऊन मोगल पुनरपि खडकीवर चालून आले. तेव्हां तेथे तुंबळ रणसंग्राम होऊन मलिकंबरास पराभव पावून पळून जावें लागलें. पुढें त्यानें मोगलांशीं तहाचें बोलणें चालवून कांहीं अटींवर सल्ला करून घेतला; आणि बादशहानें पडतें घेऊन प्रकरण मिटविलें. ही संधि लाभतांच अंबरानें आदिलशहा व कुल्बूराद्दा ह्यांच्याशीं गोडी करून त्यांची फौज मदतीस आणिली, आणि बादशहा दूर काश्मिरांत गेला, अशी वेळ पाहून बऱ्हाणपुरावरच चाल केली. सहा महिनेपावेतों त्याचा वेढा बऱ्हाणपुरास होता. त्यांत अंबराचे बाजूस भोसले मंडळी मालोजी, शहाजी वगैरे होते. त्याच वेळीं वऱ्हाड व खानदेश ह्या भागांतील पुष्कळसा प्रदेश मलिकंबरानें इस्तगत केला. ही वार्ता ऐकून जहांगीर खडबडून जागा झाला. त्यानें आपला मुलगा शहाजहान ह्यास मोठ्या फौजेनिशीं सन १६१७ साली राजधानींतून जंगी तयारीनें पुढे पाठवून, आपणही स्वतः निजामशाही जिंकण्याकरितां मांडवगडपर्यंत चालून आला. शहाजहाननें विजापुरच्या राजास व कित्येक मराठे सरदारांस मलिकंबराचे कटांतून फोडिलें, तेव्हां निरुपाय होऊन मलिकंबर शहाजहानास शरण गेला, आणि त्यानें अहंमदनगर व सभोवतालचा प्रांत मोगलांस दिला. पुढें शहाजहान बापाबरोबर काश्मिराकडे गेल्यावर मलिकंबरानें पुनः मोगल फौजेस हांकून देऊन आपले प्रांत परत घेतले. बाळापुर जिंकून त्यानें प्रत्यक्ष बऱ्हाणपुरास वेढा घातला. मलिकंबराच्या हाताखाली पुष्कळ मराठी फौजा तयार झाल्या आणि त्यांच्या मदतीनें त्यानें मोगलांस जर्जर करून नर्मदेपार मांडवगड- पर्यंतचा प्रदेश लुटला. सहा महिने

मलिकंबराचा वेढा बन्दाणपुरास होता. मोगल सुभेदार खानखानान ह्यांत कोंडला जाऊन बादशहाकडे वरचेवर मदत मागत होता. तेव्हां पुनरपि सन १६२१ चे प्रारंभी बादशहानें शहाजहानास लाहोराहून दक्षिणेंत पाठविलें. तो लगोलग मलिकंबरास मागें रेटीत बऱ्हाणपुर घेऊन खडकीबर आला. तीन दिवसांत त्यानें खडकीचे नवीन शहर धुळीस मिळविलें. तेव्हां मलिकंबरानें शरण जाऊन १८ लाख रुपये खंडणी देण्याचें कबूल करून तह करून घेतला. ह्याप्रमाणें दक्षिणचा कार्यभाग उरकून शहाजहान सन १६२२ च्या मार्चीत ब-हाणपुराहून परत उत्तरेंत गेला. तिकडे पुढें बापाविरुद्ध उठून त्यानें बंड केलें, आणि यमुनेच्या कांठीं पराभव पावून तो परत दक्षिणेंत मलिकंबर व आदिलशहा ह्यांची मदत मागण्यास आला. ह्या संधीचा फायदा मलिकंबरानें चांगला घेतला. आदिलशहा व मोगल एक होऊन त्याजवर चालून आले असतां, नोव्हेंबर सन १६२४ त नगराजवळ भातवडी येथें त्यांचा मलीकनें साफ फन्ना उडविला. हा विजय शहाजीच्याच पराक्रमानें मलिकंबरास मिळाला, त्यामुळे इळूहळू दक्षिणच्या कारभारांत शहाजीचें वजन झपाय्यानें वाढत गेलें. ह्यापुढें मलिकंबराशीं शहा- जहाननेंही सख्यच ठेविलें; परंतु तो वृद्ध मुत्सद्दी सन १६२६ च्या मे ता० १० रोजीं ८० वर्षाचा होऊन मरण पावला. त्याचा मुलगा फत्तेखान बापासारखा हुशार नव्हता आणि शहाजीशीं त्याचें पटलें नाहीं. शहाजहान अद्यापि बंडखोरींतच भटकत होता. सन १६२६ च्या अखेरीस तो जुन्नरास निजामशाहीच्या आश्रयास आला. तो सुमारें एक वर्ष तेथे होता. जहांगीर सन १६२७ च्या ऑक्टोबरांत मरण पावल्याची बातमी त्यास कळली तेव्हां तो व महाबत- खान असे जुन्नराहून सन १६२७ अखेर निघून परत गेले. त्या उपरांत पुढील वर्षाच्या जानेवारींत शहाजहानास बादशाही तख्त मिळालें. मलिकंबरानें दौलताबादेस एक मोठा घुमट बांधिला होता, तेथे त्याचें दफन करण्यांत आलें. त्याची जमाबंदीची पद्धति नांवाजलेली असून राज्यचातुर्य, न्यायी वर्तन, ईश्वरभक्ति, औदार्य व शौर्य ह्या गुणांविषयीं दक्षिणेंत त्याची फार आख्या आहे.

**निजामशाहीची अखेर (सन १६३३) —**

मलिकंबर मरण पावल्या- नंतर त्याचा मुलगा फत्तेखान हा कांहीं दिवस निजामशाहीचा कारभार पाहत होता. पण तो बापासारखा शहाणा नव्हता. तरी निजामशाही राखण्याविषयीं प्रयत्न करीत असतां, इतर सल्लागारांच्या सांगण्यावरून त्यास निजामशहानें कैदेत टाकिलें. तेव्हां कांहीं काळ शहाजीनें निजामशाहीस हात दिला. लखुजी जाधवराव म्हणून एक वजनदार मराठा सरदार दरबारांत होता, तो पूर्वीपासूनच मोंगलांस सामील होऊन निजामाविरुद्ध लढत होता. त्यास निजामशहानें कैद करविलें आणि कांहीं दिवसांनीं त्यास व त्याचा मुलगा आचलोजी ह्यांस ठार मारविलें, ( २५-७-१६२९), तेव्हां जाधवरावाचा भाऊ भेताजीराव हा मोगलांकडे पळून गेला. त्याचा जांवई शहाजी भोसले पुण्याच्या आसपास निजामशहाच्या व आदिलशहाच्या सरहद्दीवरील मुलखांबर साधेल तितका हात मारून स्वतंत्रपणें कारभार करूं लागला. राजधानींत मोगलांचा प्रवेश झाला होता, तरी बाहेरच्या मुलखावर त्यांचा ताबा बसला नव्हता. म्हणून प्रांतांत जे कामदार होते, तेच आपापल्या ताब्यांतील मुलखांवर स्वतंत्र अंमल करूं लागले. त्यांत विशेषतः सह्याद्रीचे पूर्वेकडील बहुतेक डोंगरी मुलूख मराठ्यांच्या ताब्यांत होता. जाधवरावाच्या मरणानंतर निजामशाहींतील मराठे कामदार थोडे- बहुत एकचित्त झाले. त्यांत शहाजी भोसले प्रमुख होता. जुन्नर येथे श्रीनिवास नांवाचा एक अंमलदार सरनाईक होता, तो शहाजीस मिळाला. ह्या उभयतांनीं मिळून शहागड किल्ला हस्तगत करून युक्तिप्रयुक्तीनें फौज जमविली, आणि संगमनेरपासून अहंमदनगर व दौलताबादपर्यंतचा मुलुख हस्तगत केला. शहाजीनें विजापुरकरांचाही कांहीं मुलुख बळकाविला होता. म्हणून आदिलशहानें मुरारराव नांवाच्या आपल्या सरदारास शहाजीवर पाठविलें. मुराररावानें पुणे वगैरे शहाजीचे प्रांत घेऊन त्याचें बरेंच नुकसान केलें. ह्याच मुराररावाच्या हाताखालीं बाजी दळवी म्हणून एक कामगार होता, तो मुराररावाच्या हुकुमानें तळकोकणांत शिरून महाडकडील निजामशाहीचा मुलुख जिंकीत होता, हें वर्तमान निजामशहास समजतांच, त्यानें फौज पाठवून बाजी दळवी ह्यास युद्धांत ठार मारून आपले प्रांत पुनः परत मिळविले. ह्याच संधीस खानजहान लोदी उत्तर हिंदुस्थानांत शहाजहान बादशहाविरुद्ध बंड करून दक्षिणेत आला. त्यास शहाजी भोसले व दुसरे मराठे सरदार अनुकूल झाले. पण बादशाही फौज खानजहानच्या पाठीवर असल्यामुळे शहाजी लवकरच त्याचा पक्ष सोडून शहाजहानास शरण गेला. बादशहानें त्यास ५००० स्वारांची सरदारी दिली. तेव्हां लोदीनें मुर्तुजाशहाचा आश्रय केला, त्यावरून मोगलांनी निजामशहाशीं युद्ध करून त्याचा पराभव केला. ह्याच सुमारास म्हणजे

सन १६२९-३० त दक्षिणेंत भयंकर दुष्काळ पडून निजामशहीवर दुसरें अरिष्ट आलें. दोन वर्षे सारखें अवर्षण पडलें. त्यामुळे लोक मुलूख सोडून गेले आणि बहुतेक मरण पावले. वैरण न मिळून गुरांढोरांचाही फन्ना उडाला. प्रांतचे प्रांत ओसाड पडले, मागाहून महामारी येऊन लोकांच्या विपत्तीचा कळस झाला. ह्याच वेळीं मोगलांची आणखी मोठी फौज दक्षिणेंत आली; पेमगिरीचा डोंगर नगरच्या पश्चिमेस बालेश्वर रांगेवर आहे. त्यावरील किल्यास पेमगड म्हणतात. शहाजीनें त्यास शहागड नांव दिले. मूर्तुजा व दिवाण फत्तेखान ह्यांचें बनेनासें होऊन फत्तेखान कैदेंत पडला होता, त्यास सोडवून पुनः शहानें अधिकारापन्न करतांच त्यानें मुर्तुजास कैद करून, त्यास व त्याच्या पक्षाच्या अनेक सरदारांस ठार मारिलें आणि आपण सर्व निजामशाही ताब्यांत घेऊन मोगलांस शरण गेला. मूर्तुजाचा हुसेन नांवाचा दहा वर्षांचा मुलगा होता, त्यास त्यानें निजामशाहीच्या तख्तावर स्थापिलें. ह्या कृत्याचा शहाजी भोसले ह्यास फार तिटकारा आला. त्यानें विजापुरच्या राजाशीं सख्य करून दौलताबाद किल्ला फत्तेखानापासून घेण्याकरितां विजापुरची फौज आणिली. तेव्हां फत्तेखानानें दिल्लीहून मोगलांची फौज आणविली. शहाजहाननें महाबतखान नामक सरदारास दौलताबादचा किल्ला घेण्यास पाठविलें. विजापुरच्या फौजेचा व मोगल फौजेचा दौलताबादच्या समोर सामना होऊन विजापुरकरांचा पराभव झाला. तरी फत्तेखानास फितवून त्यास विजापुरच्या राजानें साहाय्य करून मोगलांशी लढाई चालविली. ह्यामुळे महाबतखान फारच चिडून गेला. त्यानें दौलताबादेवर निकराचा हल्ला केला. अठ्ठावीस दिवसपर्यंत तुंबळ युद्ध झालें आणि अखेरीस किल्ला मोगलांच्या हातीं गेला, (१७-६-१६३३). फत्तेखान व बालराजा यांस कैद करून त्यानें दिल्लीस पाठविलें, आणि निजामशाहीचा सर्व मुलुख काबीज केला. येणेंप्रमाणें अहंमदनगर येथें निजामशाहीची स्थापना झाल्या-पासून सुमारें दीडरों वर्षांनीं म्हणजे सन १६३३ त त्या राज्याची समाप्ति झाली. फत्तेखान व त्याचा भाऊ जंगीझखान यांस शहाजहानकडून उत्तर हिंदुस्थानांत नेमणुका मिळाल्या.

**शहाजी भोसले ह्याची अखेरची धडपड, (१६३३-३७) —**

इतकें झाल्यावरही शहाजीनें निजामशाहीचा उद्धार करण्याची दोन तीन वर्षे जिवापाड मेहनत केली. ह्या वेळीं ह्या शूर पुरुषानें जें आचरण केलें, जीं घोरणें बांधलीं व जी शिताफी दाखविली, तीच त्याचा अल्पवयी मुलगा शिवाजी ह्यास प्रेरक होऊन, त्यापासून मराठशाहीची संस्थापना करण्याची त्यास शक्ति आली. निजामशाहीखालीं मोडणारा सह्याद्रीवरचा डोंगराळ प्रदेश शहाजीनें ताब्यांत घेऊन तेथील अवघड किल्लयांच्या साह्यानें मोगलांशीं टक्कर देण्याची तयारी केली. बरीच जमवाजमव केल्यावर शहाजीनें एक मुलगा निजामशाहीच्या गादीवर बसविला, आणि कित्येक हुशार ब्राह्मण नोकरीस ठेवून त्यांच्या सल्ल्यानें तो निजामशाहीचा कारभार चालवू लागला. असें करितां करितां कोंकणपट्टीसुद्धां पुष्कळ मुलुख शहाजीच्या ताब्यांत आला. दक्षिणेतील युद्धाचा पुनः पहिलाच दिवस आला असें पाहून शहाजहान बादशहानें पुनः युद्धाची तयारी केली आणि मोठमोठे सरदार पुढे पाठवून मागाहून आपणही स्वतः इकडे आला. शहाजीस विजापुरचा दिवाण मुरारपंत व मुख्य सरदार रणदुल्लाखान यांची चांगली मदत होती. बादशहानें विजापुरकरांस कळविलें, की 'शहाजीचा पक्ष सोडा; नाहीं तर तुमचाही संहार करूं'. आदिलशहानें तें बोलणें मान्य केलें नाहीं, म्हणून शहाजहाननें आपल्या फौजेचे निरनिराळे भाग करून युद्ध सुरू केलें. सर्व ठिकाणीं मोगलांनीं शहाजीस जेरीस आणलें. नंतर मोगल विजापुरच्या मुलखांत शिरून त्रास देऊं लागले, तेव्हां आदिलशहानें त्यांजशीं तह केला. नंतर शहाजी कोंकणांत गेला. तेथेंही आपला निभाव लागत नाहीं असें पाहून सन १६३७ त तो शहाजहानास शरण गेला आणि आपणास पदरीं ठेवण्याविषयीं त्यानें बादशहास विनंति केली. शहाजहाननें ती मान्य केली नाहीं; तरी विजापुरकरांच्या पदरीं राहण्यास शहाजीस त्यानें परवानगी दिली. शहाजीनें गादीवर बसविलेल्या निजामशहास व त्याच्या इतर साथीदारांस शहाजहाननें आध्यास नेऊन कैदेंत ठेविलें.